**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४८/२०१६-१७/८० दिनांक: ०७-०३-२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ४८/२०१६-२०१७**

१) श्री. उदयकुमार दामोदर कल्याणकर
१०३४/१ प्लॉट क्र.२०२ इंगवले कॅालनी
पोदर इग्लीश स्कूलजवळ कोल्हापूर : **तक्रार अर्जदार (ग्राहक)**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग कोल्हापूर : **विरुध्द पक्षकार**

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मध्य उपविभाग, कोल्हापूर

**कोरम:-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार श्री उदयकुमार दामोदर कल्याणक, १०३४/१ प्लॅाट क्र.२०२ इग्लीश स्कूलजवळ, कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे , त्यांनी नविन बांधलेल्या घरामध्ये वीज जोडणी मिळणेसाठी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप

२) तक्रारदार यांनी कसबा करवीर, ता. करवीर जि. कोल्हापूर येथील जमिन सर्व्हे क्र.१०३४/१ यापैकी प्लॅाट क्र.२०२ फेब्रुवारी २०१५ मध्ये खरेदी करुन त्यावर घराचे बांधकाम केले आहे. दरम्यान पंचरत्न डेव्हलपर्स यांचे भागिदार , वटमुखत्यार यांच्यामध्ये दिवाणी न्यायालयात वाद दाखल झाले दरम्यान जून २०१६ मध्ये तक्रारदार यांनी त्यांच्या घरात वीज पुरवठा मिळणेसाठी रितसर अर्ज दाखल केला. वीज कनेक्शनस देणेत येऊ नये. अशा काही तक्रारी वि.प. यांना देणेत आल्या. त्याबाबत कायदेशीर अभिप्राय मागविणेत आले. तक्रारदार यांचा भूखंड क्र.२०२ यामध्ये प्रत्यक्ष ताबा (Occupier) असल्याने वीज जोडणी देता येईल असा अभिप्राय दिल्यानंतर पुढील कार्यवाही सुरु झाली. दरम्यानच्या काळात तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दि. २४-११-२०१६ रोजी तक्रार दाखल केली. सदर कक्षाच्या दि. २९-१२-२०१६ च्या आदेशाने समाधान झाले नसल्याने तक्रारदार यांनी या मंचाकडे अपिल दाखल केले आहे.

## वि. प.यांची भूमिका

३) वि.प. यांनी असे कथन केले आहे की, तक्रारदार यांना वीज जोडणी देणे संदर्भात काही कायदेशीर व तांत्रिक अडचणी आल्या होत्या, आणि त्याबाबत विधी अधिकारी यांचेकडून कायदेशीर सल्ला मागणेत आला होता. कायदेशीर अभिप्राय मिळाल्यानंतर वरीष्ठ कार्यालयास एस्टीमेंट मंजूरीसाठी पाठवणेत आले. त्यास मंजूरी मिळालेनंतर प्रकाश कृष्णा राऊत आणि शिवाजी सदाशिव सुतार यांनी वीज जोडण्या न देणेबद्दल तक्रार अर्ज सादर केले. त्या बाबतही कायदेशीर अभिप्राय मागणेत आला व त्यास अनुसरुन तक्रारदार यांचेकडून प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांना दि. ०१.०३.२०१७ रोजी कोटेशन देणेत आले आहे. कोटेशनची रक्कम त्यांनी जमा केल्यानंतर त्यांना सात दिवसात वीज जोडणी देणेत येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी दि. ०२.०३.२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार अगर त्यांचेतर्फे कोणीही हजर नव्हते. वि.प. तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री संजय गवळी व सहाय्यक अभिंयता श्री इंद्रजित कांबळे उपस्थित होते. त्यांचे तोंडी निवेदन ऐकणेत आले. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) तक्रारदार यांची तक्रार, वि.प. यांचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे आणि तोंडी युक्तिवादाचा विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना भूखंड क्र.२०२ यावरील त्यांच्या घरामध्ये त्यांच्या मागणी प्रमाणे नविन वीज जोडणी देणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असें दिसून येते की, तक्रारदार व त्यांच्या पत्नी यांनी उपरोक्त प्लॅाट क्र.२०२ क्षेत्र २७० चौ.फूट हा भूखंड जानेवारी फेब्रुवारी २०१५ मध्ये खरेदी केला. सदर खरेदी पत्राच्या वैधतेबाबत या मंचाने विचार करण्याची जरुरी नाही. तक्रारदार यांनी सदर भूखंडावर घराचे बांधकाम केले आहे आणि त्यानंतर नविन घरगुती वीज जोडणी मिळणेबद्दल महावितरणकडे अर्ज सादर केला आहे. सदर घराचे बांधकाम कायदेशीर आहे किंवा नाही वगैरे बाबींचा या प्रकरणात विचार करण्याची गरज नाही. सर्व वादग्रस्त मुद्यांबाबत सक्षम न्यायालय निर्णय घेतील. तक्रारदार हे सदर भूखंड व त्यावरील घराचे मालक आहेत किंवा नाही याबाबतही योग्य न्यायालय निर्णय येईल.तथापि, तक्रारदार यांचा प्रत्यक्ष ताबा (Occupier) आहे याबाबत फारसा वाद नाही. वि.प. यांना या संदर्भात कायदेशीर अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

७) सबब तक्रारदार यांना त्यांच्या नविन घरासाठी वीज जोडणी देण्यात काहीच अडचण दिसत नाही. यापूर्वीच त्यांनी हमीपत्र , प्रतिज्ञापत्र , बंधपत्र अशा स्वरुपाचे लेख वि. प. यांना लिहून दिले आहेत. त्यानंतर त्यांना दि. ०१.०३.२०१७ रोजी रक्कम भरणेसाठी कोटेशन दिलेले आहे. कोटेशनची रक्कम तक्रारदार यांनी भरल्यानंतर सात दिवसात वीज जोडणी देणेत येईल असे वि.प. तर्फे सांगणेत आले आहे.

८) या प्रकरणात तक्रारदार यांनी अन्य कोणतीही मागणी मंचाकडे केलेली नाही.

९) वरील सर्व परिस्थितीत तक्रारदार यांचे सदरचे गा-हाणे मंजूर करणे क्रमप्राप्त आहे.

सबब, खालील प्रमाणे अंतिम आदेश देणेत येत आहे.

**आदेश**

१) तक्रारदार श्री उदयकुमार दामोदर कल्याणक, १०३४/१ प्लॅाट क्र.२०२ इगलीश स्कूलजवळ कोल्हापूर यांनी जरुर ती रक्कम वि.प. यांच्या संबंधीत कार्यालयात जमा केल्यानंतर त्यांच्या मागणी प्रमाणे घरगुती नविन वीज जोडणी दहा दिवसांचे आंत देऊन वीज पुरवठा सुरु करणेत यावा असा वि.प. यांना आदेश देणेत येतो.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |